दिनांक २१/०९/२०२०

# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक तुषार विनय नांद्रे, वय ४० वर्ष, सहायक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी. मर्या, कार्यालय सावंगी, औरंगाबाद यांनी १७,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव व पत्ता | :- | तुषार विनय नांद्रे, वय ४० वर्ष, सहायक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी. मर्या, कार्यालय सावंगी, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. |
| घटनेचे ठिकाण | :- | सहायक अभियंता कार्यालय, म.रा.वि.वि. कंपनी. मर्या, सावंगी, औरंगाबाद |
| लाच स्विकारली रक्कम | :- | १७,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | लाईन शिफ्टींगसाठी व ग्राहकांचे नवीन विद्युत मीटरची फाईल मंजुर करण्यासाठी लाचेची मागणी |
| तपासी अधिकारी | | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार हे विद्युत ठेकेदार असून, त्यांच्याकडे लाईन शिफ्टींगसाठी व ग्राहकांचे नवीन विद्युत मीटरची फाईल मंजुर करण्यासाठी तुषार नांद्रे, सहायक अभियंता हे १७,०००/- रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद कडे दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, तुषार विनय नांद्रे, सहायक अभियंता यांनी तक्रारदार यांचेकडे १७,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज दिनांक २१/०९/२०२० रोजी वर नमुद ठिकाणी सापळा लावण्यात आला असता, आरोपी लोकसेवक तुषार विनय नांद्रे, सहायक अभियंता, म.रा.वि.वि. कंपणी. मर्या, कार्यालय सावंगी, औरंगाबाद यांनी १७,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे फुलंब्री, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, प्रभारी पोलीस अधीक्षक मा.डॉ.अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोना/अरूण उगले, रवींद्र अंबेकर, विलास चव्हाण यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

(बी.व्ही.गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.